Newspaper : Loksatta

Article date : 15th February 2018

Article regarding Platinum Jubilee Celebration

# 'पोद्दार'ची पंचाहत्तरी

**कालानुरूप बदल** करत, जुन्याबरोबर नव्याचा स्वीकार करत माटुंग्याच्या रा. आ. पोद्दार महाविद्यालयाने नुकताच अमृतमहोत्सवी टप्पा पूर्ण केला आहे. शिक्षण प्रसारक मंडळींनी सुरू केलेल्या या महाविद्यालयाचे नाव वाणिज्य शाखेतील आघाडीच्या महाविद्यालयांत आवर्जून घेतले जाते. विविध क्षेत्रांतील दिग्गज्यांच्या जडणघडणीत महाविद्यालयाचा मोठा वाटा आहे. उद्योजक भंवरलाल जैन, फारूक इंजिनीअर, दिलीप वेंगसरकर, संजय मांजरेकर, रवी शास्त्री यांसारखे क्रिकेटमधील अव्वल मोहरे; उदय टिकेकर, आरती अंकलीकर-टिकेकर, सुरेश खरे, विजय केंकरे, तुषार दळवी, दामोदर मावजो, अरुण म्हात्रे यांसारखे संगीत, नाटक, सिनेमा, साहित्य अशा विविध कलाक्षेत्रांतील नामवंत पोद्दारचे माजी विद्यार्थी आहेत. यशस्वी असा हा ७५ वर्षांचा टप्पा साजरा करण्यासाठी महाविद्यालयाने त्याच्या आजी-माजी विद्यार्थ्यांसोबत प्लॅटिनम ज्युबिली सेलिब्रेशनचे आयोजन केले आहे. १९ फेब्रुवारी २०१८ रोजी, सायंकाळी ५.३० वाजता शीव येथील षण्मुखानंद सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमात पोद्दार महाविद्यालयाच्या यशस्वी प्रवासावर प्रकाश टाकणारे विविध उपक्रम आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या पंचाहत्तर वर्षांचा आढावा घेणारी 'कल आज और कल' ही स्मरणिका या समारंभात प्रकाशित करण्यात येणार आहे.